**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण**
**पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे-१६**
( यापुढील पत्रव्यवहारासाठी खालील क्रमांक व दिनांक याचा उल्लेख करावा. )

( जागेच्या व इमारतीच्या कायदेशीर मालकी हक्कांचे संदर्भ लक्षात न घेता अर्जदारास हे संमतीपत्र देण्यात येत आहे.)

**बांधकाम चालू करण्याकरिता दाखला**
**दुरुस्त ( कमेन्समेंट सर्टिफिकेट )**

सदरचा बांधकाम चालू करण्याचा दाखला आणि बांधकामाचे संमतीपत्र महाराष्ट्र नगर रचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४/४५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४, व महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ यातील तरतूदींप्रमाणे खालील अटींवर देण्यात येत आहे.
१) (प्रथम बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/१७६२ दि. २१/१०/२०१६)

जा.क्र. झोपुप्रा/तां.२/प्र.क्र.२०९/ २५३ /२०१८
दिनांक- २१/०२/२०१८

प्रति,
**विकसक- श्री लक्ष्मी नारायण रियालिटी प्रा.लि.**
**१०४ महात्मा फुले पेठ, पुणे.**

द्वारे

**आर्किटेक्ट- मे. ओंकार असोसिएट्स,**
**२ तृप्ती अपार्टमेंट, भांडारकर रोड,**
**हॉटेल रणजित समोर, पुणे.**

यांस -

महाराष्ट्र नगररचना अधिनियम, सन १९६६ ची कलमे ४४ / ४५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, सन १९४९ ची कलमे ( सेक्शन्स ) २५३ व २५४ व महाराष्ट्र झोपडपट्टी ( सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास ) अधिनियम १९७१ पुणे महानगरपालिका सीमेतील **स.नं. ५२६, फा.प्लॉ.क्र. २७८, सब प्लॉ.क्र. ३ ते ९, महात्मा फुले पेठ, पिंपळमळा, पुणे** येथील दुरुस्त **बांधकाम नकाशे** मान्य करण्यासाठी या कार्यालयाकडे आपण दि. १५/०१/२०१८ रोजीच्या पत्राने विनंती केली. त्यावरुन उक्त अधिनियम व प्रस्तावित नियमावलीतील अटींवर तुम्हांस हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

कनिष्ठ अभियंता
झो.पु.प्रा. पुणे.

**उप अभियंता (वर्ग १)**
**झो.पु.प्रा. पुणे.**

## अटी

१. संबंधी सुधारित विकास योजना आराखडा महाराष्ट्र सरकारने दि. ५/१/२०१७ या दिवशी मान्य केला आहे. त्यास अनुसरुन कामास काही उपसर्ग पोहोचत असल्यास अथवा हानी होत असल्यास त्या प्रित्यर्थ कोणत्याही प्रकारची भरपाई मागता येणार नाही. व ती देण्याची जबाबदारी झो.पु.प्रा. वर नाही.

२. ज्या प्लॉट्सवर नवीन इमारत बांधण्यात येणार आहे त्या इमारतीचे भोगवटापत्र मागण्यापूर्वी प्रत्येक विकसकाने इमारतीसमोर कंपाऊंड वॉलच्या आत वृक्ष संवर्धन कायदा १९७५ च्या तरतूदींनुसार झाडे लावून ती व्यवस्थीत वाढविण्याच्या दृष्टीने योग्य ती व्यवस्था व खबरदारी घ्यावी. त्याशिवाय Occupancy Certificate (भोगवटापत्र) मिळणार नाही. रस्त्यावरील झाडांना जरुर ते संरक्षण कुंपण अर्जदाराने करावयाचे आहे.

३. मालकी हक्काबाबत व इतर कोणत्याही हक्काबाबत वाद निर्माण झाल्यास त्यास विकसक जबाबदार राहील. सदर बाबतीत झोपुप्रा कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४. कामगारांच्या सोयीसाठी जागेवर किमान पुरेशा संडास / मुता-या तात्पुरत्या स्वरुपाच्या बांधल्या पाहिजेत. तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक व्यवस्था करणेची जबाबदारी विकसकाची राहील.

५. सदर प्रकरणी मान्य ले-आऊट नकाशा वरील अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

६. Slum Act १९७१ व झो.पु.प्रा.ची नियमावली, शासनाकडून वेळोवेळी प्राप्त निर्देशानुसार कार्यवाही करणे बंधनकारक राहील. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांचे मान्यतेने अटी घालण्याचे अधिकार झो.पु.प्रा. कार्यालयास राहतील.

७. इको हौसिंग बाबत सर्व अटी बंधनकारक राहतील.

८. या बांधकामासाठी Rain Water Harvesting करुन पावसाचे पाणी साठविणे व ते पुनर्वापर करणे बंधनकारक राहील.

९. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेले परिपत्रक व अटी विकसकावर बंधनकारक राहतील.

१०. विक्री घटकात बाल्कनी खुली ठेवणे विकसकावर बंधनकारक राहील.

११. सदर योजनेचे बांधकाम क्षेत्र ५००० चौ. मी. ते २०००० चौ. मी. मधील येत असल्याने शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. २८/०६/२०१७ ची अधिसूचना क्र. TPS-१८१६/CR-४४३/१६/DP/Pune & Kokan/UD-१३ सोबतच्या Appendix-'A' मधील Category-I मध्ये सदर योजनेचा समावेश होत असल्याने Category-I मधील पर्यावरण विषयक अटींची पुर्तता करीत असल्याबाबत हमीपत्र विकसकाने दिलेले आहे. त्यानुसार आवश्यक बाबींची पुर्तता करणे विकसकावर बंधनकारक राहील.

१२. हा दाखला दोन वर्षा पर्यंत अस्तित्वात राहील. पुढे तो आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल. सदर संमतीपत्राची मुदत संपल्यानंतर पुन्हा अर्ज करुन संमतीपत्राची मुदत वाढवून घेतली पाहिजे व असे संमतीपत्र मिळाल्यानंतरच बांधकाम सुरु करावे.

१३. विकसकाने सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने सदर संमतीपत्र देण्यात येत असुन खोटी कागदपत्रे सादर केली असल्याची आढळल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी विकसकाची राहील व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास कुठलेही तोषीस लागु राहणार नाही.

### प्रकल्पांची गुणवत्ता तपासणी

सदर प्रकल्पाचे बांधकाम झो.पु.प्रा.ने निश्चित केलेल्या मानकाप्रमाणे करणे विकसकावर बंधनकारक राहील. तसेच प्रकल्पाचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी बांधकामात वापरण्यात येणा-या मालाची गुणवत्ता तसेच बांधकामाचा दर्जा याबाबत कसलीही तडजोड न करता बांधकाम करणेची सर्व जबाबदारी विकसकाची राहील.